FORM-I A. N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि.मु., पहिली खबर क्र. FIR No. ०२, वर्ष Year २०१९, दिनांक Date ०३/१/२०१९

2. (i) अधिनियम Act: भ्र.प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections: ७
 (ii) अधिनियम Act: (सुधारीत अधिनियम २०१८), कलमे Sections ........
 (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना: वार Occurrence of offence: Day: बुधवार, तारीख पासून Date from: २६/१२/१८, वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to: ०३/१/१९, वेळ Time: १२.१६ वा.
 वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
 (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
 (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
 (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S.: तारीख Date: ०३/०१/२०१९, वेळ Time: १२:१६ वा.
 (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference: Entry No.: 02/२०१९, तारीख Date: 03/01/२०१९, वेळ Time: 09:30

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी, लेखी/तोंडी Written/Oral ——

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence: (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S.: अंदाजे ३० कि.मी. उत्तरेस, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ........
 (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: पी/उत्तर वॉर्ड, बृ.म.न.पा. ऑफीस, ठिकाणाचे नंबर No. if any ........, गल्ली Ward: मामलेदार वाडी, रस्त्याचे नाव Name of road: लिबर्टी गार्डन
 जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place: लिबर्टी गार्डन, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka: मालाड, जिल्हा Distt.: मुंबई, राज्य State: महाराष्ट्र
 (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant: Permanent Address.
 (a) नाव Name: श्री सद्दाम उर्फ मेहराब (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: शौकत अली अन्सारी
 (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: ३० वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: ९९२०२६६६२४, ७६९९२०५९५
 (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation: बांगड्या बनविण्याचा कारखाना
 (g) धर्म Religion: मुस्लीम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
 (h) पत्ता Address: रुम नं. ३०६, प्लॅटिनम (बी), गेट नं. ५ जवळ, कलेक्टर कंपाऊंड, मालवणी मालाड (प) मुंबई ९५
 गल्ली / वार्ड Ward, घर / ग्रीम नंबर House/Name No., फोन / मो. नंबर Phone/M. No., पॅन नं. Pan No., व्होटर्स नं. Card No. ........
 रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गांव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........
 तालुका Taluka ........ जिल्हा Distt. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
 Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

घनश्याम सोपान थोरपडे, वय ४९ वर्ष, धंदा- नोकरी (नोटीस कारकुन) पिठी रवाने, मुंबई म.न.पा. पी/उत्तर, मालाड (प) रु. बा.ठी. ५४/२०३ छत्रपती शिवाजी नगर, संकुल म्हाडा, एकता नगर, कांदिवली (प) मुं ६७ मो.नं. ९८२२२२५२२२
९८२२२२५२२२

खालील फिर्यादी श्री. सद्दाम उर्फ मेहराज शौकत अली अन्सारी वय २० वर्षे व्यवसाय- बांगड्या बनविण्याचा कारखाना रा. ठी. रूम नं. १०७, प्लॉट नं. ८ बी, गेट नं. ५ जुने कलेक्टर कंपाऊंड, मालवणी मालाड (प) मुंबई ९५ यांचा दिनांक १/३/२०१९ रोजीच्या मराठील टेकनिकल केलेली फिर्यादी जबाब हेच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणुन संबोधण्यात आली असुन सोबत जोडण्यात आली आहे.

समक्ष

(अभय दाभाडे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

**फिर्याद** दिनांक– ०२/०१/२०१९.

श्री. सद्दाम उर्फ मेहराज शौकतअली अन्सारी, वय २७ वर्षे, व्यवसाय: धंदा (हातातील बांगडयांचा कारखाना,) रा.ठि. रू.नं.१०७, प्लॉट नं.८/बी, गेट नं.५, ओल्ड कलेक्टर कपाउंड, मालवणी, मालाड, पश्चिम, मुंबई ४०० ०९५ मोबाईल नं.९९२०३६६६३४, ८१६९८२०५८५

मी वरीलप्रमाणे असुन माझ्या कुटूंबासमवेत वरील पत्त्यावर जन्मापासुन राहावयास असुन सदर ठिकाणी हातातील बांगडया बनविण्याचा कारखाना असून त्या विक्री करून त्यावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवितो.

दिनांक २४/०८/२०१८ रोजी फॅक्टरी डिर्पाटमेंट पी/नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, लिबर्टी गार्डन, मालाड, पश्चिम, मुंबई येथील अधिकारी श्री व्ही. आर. अमृसकर हे माझ्या राहते घरात चालत असलेला बांगडया बनविण्याचा कारखान्याचे निरीक्षण करण्याकरीता आले होते. त्यावेळी त्यांनी सदर कारखान्याचे निरीक्षण करून तसा निरीक्षण अहवाल जागेवरच तयार करून त्याची एक प्रत मला दिली. त्यानंतर त्यांनी मला सांगितले की, त्यांचे कार्यालयातील एक व्यक्ती तीन ते चार महिन्यानंतर येवून तुमचा कारखाना पाहून निघून जाईल. त्यानंतर दिनांक २६/१२/२०१८ रोजी पी/नॉर्थ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, लिबर्टी गार्डन, मालाड, पश्चिम, मुंबई येथून एक व्यक्ती श्री. घनश्याम घोरपडे आले व त्यांनी मला सांगितले की, तुमच्या कारखान्या विरूध्द कोर्टात केस झाली असून तुम्हाला कोर्टात रू.१५ ते २० हजार रूपये दंड भरावा लागेल. पण तुम्ही मला १० ते १२ हजार दिले तर तुमची केस मी कोर्टातून काढून घेतो असे म्हणून लाचेची मागणी केली. लोकसेवक घनश्याम घोरपडे यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक २८/१२/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो. त्यावेळी पोनि दाभाडे यांनी घनश्याम घोरपडे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा लेखी तक्रार अर्ज त्यांचे हस्ताक्षरात स्वत: माझे सांगण्याप्रमाणे लिहीला व त्यावर माझी सही घेतली. त्यानंतर पोनि दाभाडे यांनी उदईक दिनांक २९/१२/२०१८ रोजी माझ्या तक्रारीची पडताळणी करण्यात येईल असे सांगुन मला उदईक दिनांक २९/१२/२०१८ रोजी लाप्रवि कार्यालयात सकाळी ०९.३० वाजता येण्यास सांगितले.

त्यानंतर पोनि दाभाडे यांनी दिनांक २९/१२/२०१८ रोजी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. त्यावर पोनि दाभाडे यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि दाभाडे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि दाभाडे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यांनतर पोनि दाभाडे यांनी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे दिनांक २९/१२/२०१८ रोजी मला चिंचोली गाव, मालाड पश्चिम, मुंबई येथुन लोकसेवक घनश्याम घोरपडे यांचे पी/उत्तर विभाग, मनपा कार्यालय, लिबर्टी गार्डन मालाड पश्चिम,मुंबई येथे पडताळणी करीता मला डिजीटल रेकॉर्डर लावून पंचासह पाठविले असता लोकसेवक घनश्याम घोरपडे यांची भेट झाली. त्यावेळी लोकसेवक व माझी माझे केस संदर्भात चर्चा झाली त्यावर लोकसेवक घनश्याम घोरपडे यांनी मला त्यांच्याकडील रजिस्टर मध्ये माझे केस सारख्या इतर केसेस दाखवुन त्यांना १०,११,१२,२५,५० हजार रूपयांपर्यंत दंड झाले असुन तुम्ही मला इतक्या इतक्या रक्कमेला पटवुन दया असे म्हणुन तुमच्या केस मध्ये मी तुम्हाला मदत करतो असे सांगुन तुम्हाला योग्य वाटेल तेवढी रक्कम

घेवून या असे सांगून लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना पैसे जमा झाल्यावर दोन ते तीन दिवसानंतर फोन करतो असे सांगितले. त्यानंतर मी पुन्हा चिंचोली गाव, मालाड पश्चिम, मुंबई येथे आलो असता पोनि दाभाडे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकुन लोकसेवक यांची पडताळणी दरम्यान लाचेची मागणी निष्पन्न झाल्याने व लोकसेवक यांना लाच रक्कम दोन ते तीन दिवसांनी दयावयाची असल्याने पुढील कारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर पोनि दाभाडे यांनी मला घरी जाण्यास सांगून दिनांक ०१/०१/२०१९ रोजी १०.०० वा. चिंचोली गाव, मालाड पश्चिम, मुंबई येथे येण्यास सांगितले.

त्याप्रमाणे मी दिनांक ०१/०१/२०१९ रोजी पोनि दाभाडे हे मला चिंचोली गाव, मालाड पश्चिम, मुंबई येथे ११.०० वाजता भेटले त्यानंतर पोनि दाभाडे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करून लोकसेवक यांचे मोबाईल क्रमांक ८१६९५१४३८४ वर मी संपर्क केला असता लोकसेवक यांनी ते ऑफीस मध्ये नाहीत उदया ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत या असे कळविल्याने पुढील कारवाई स्थगित केली. त्यानंतर पोनि दाभाडे यांनी मला घरी जाण्यास सांगून दिनांक ०२/०१/२०१९ रोजी १०.०० वा. चिंचोली गाव, मालाड पश्चिम, मुंबई येथे येण्यास सांगितले.

त्याप्रमाणे मी दिनांक ०२/०१/२०१९ रोजी चिंचोली गाव, मालाड पश्चिम, मुंबई येथे १०.३० वाजता पोनि दाभाडे यांना भेटलो. त्यावेळी पोनि दाभाडे यांनी मला लोकसेवक यांचे लाचेच्या मागणीप्रमाणे मला ६,०००/– रूपये हजर करण्यास सांगुन आज रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर त्यांनी पोलीस वाहनात माझे कडून लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ६,०००/– (रू. २०००/– दराची एक नोट व रू. ५००/– दराच्या ८ भारतीय चलनी नोटा) काढून घेतली. त्यावेळी सदरच्या नोटांना अ‍ॅन्थ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगून त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यावर मला डोक्यावर असलेली गोल टोपी काढून इशारा करावा असे पोनि दाभाडे यांनी सांगितले त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले. त्यानंतर पोनि दाभाडे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करून मला दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल वरून स्पिकर ऑन करून लोकसेवक यांचे मोबाईल क्रमांक ८१६९५१४३८४ वर संपर्क केला असता लोकसेवक यांचा मोबाईल व्यस्त आला त्यानंतर थोडया वेळाने लोकसेवक घोरपडे यांनी माझे मोबाईलवर संपर्क करून ते कार्यालयात हजर असुन त्यांनी मला येण्यास सांगितले. सदरचे संभाषण व्हाईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत करण्यात आले.

त्यानंतर पोलीस वाहनात पंचांसमक्ष लाचेच्या रकमेस अ‍ॅन्थ्रासीन पावडर लावुन माझे कुर्ताच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली त्यानंतर माझ्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून लावले त्यानंतर पंच क्र. १ याचेसह सापळा कारवाई करीता चिंचोली गाव, मालाड पश्चिम येथुन माझे मोटर सायकलवरून निघून लोकसेवक यांचे पी/उत्तर विभाग, मनपा कार्यालय, लिबर्टी गार्डन मालाड पश्चिम, मुंबई येथे आलो. त्यावेळी माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी लोकसेवक यांना भेटण्यास त्यांचे कार्यालयात पंचासह गेलो असता लोकसेवक हे कार्यालयात उपस्थित होते. त्यावेळी मी लोकसेवक घनश्याम

घोरपडे हे बसलेल्या टेबल जवळ जाऊन माझे केस संदर्भात चर्चा केली असता लोकसेवक घनश्याम घोरपडे यांनी " दे रहे हो ना" पैसा असे म्हणुन कितने लाये हो? असे म्हणाल्याने मी माझे कडील अ‍ॅन्थ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. ६०००/— (रू. २०००/— दराची एक नोट व रू.५००/— दराच्या ८ भारतीय चलनी नोटा) त्यांच्या टेबलावर ठेवले असता लोकसेवक घनश्याम घोरपडे यांनी मी दिलेल्या लाचेच्या रक्कमेपैकी रू.३,०००/— मला परत देवुन बोलले की, " मुझे जीतना चाहीए था उतना ले लिया मैने" असे बोलेले. त्यानंतर मी माझ्या केसचा पुन्हा काही अडचण येणार नाही ना याबाबत चर्चा करून त्यांचे कार्यालयातून बाहेर येवुन पोलीस पथकास लागलीच पुर्वनियोजीत डोक्यावर असलेली गोल टोपी काढून पोलीसांना इशारा केला त्यावेळी लागलीच पोलीसांनी लोकसेवक घनश्याम घोरपडे यांस रू.३०००/— लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले.

त्यानंतर लोकसेवक घोरपडे यांनी माझेकडुन स्विकारलेले रू. ६,०००/— पैकी रू. ३,०००/— मला परत दिले होते ते पोनि दाभाडे यांनी माझेकडुन घेवुन पंचनाम्यात जप्त केले.

तरी लोकसेवक घनश्याम घोरपडे, नोटीस कारकुन, पी/उत्तर विभाग, मनपा कार्यालय, मुंबई यांनी माझे बांगडीच्या कारखान्यावरती दंडाची कारवाई न होण्याकरीता माझेकडे लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारीली म्हणुन माझी त्याचेवर कायदेशिर कारवाई होण्याची विनंती आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून ती मला हिंदीत समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(अभय दाभाडे),
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि., मुंबई

18. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ..........
Reasons for delay in reporting by the complainant/informant

19. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ..........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

खालील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी श्री धनश्याम सोपान घोरपडे वय ४८ वर्षे, नोटीस कारकुन पी/उत्तर वॉर्ड, मालाड (प) म.न.पा. यांनी यातील फिर्यादी यांच्या कारखान्या विरुद्ध मा. ३८ वे न्यायालय विलेपार्ले येथे मुंबई म्युन्सीपल ॲक्ट कलम ३९० अन्वये दाखल गुन्ह्याचे प्रकरण मिटविण्यासाठी (फिर्यादी) यांचेकडे अप्रामाणिकपणे लाचेची मागणी करुन लाच रक्कम रु ६०००/- स्विकारुन त्यातील रु. २०००/- फिर्यादी यांना परत करुन रु. ४०००/- लाचेचा स्वतः साठी गैरलाभ स्विकारला म्हणुन भ्र.प्र.अधि. १९८८ (सुधारीत अधि. २०१८) कलम ७ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

अभय खंडेराव दाभाडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. ..........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S .........., District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name अभय खंडेराव दाभाडे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**